# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
### गुरूवार, दिनांक १५ जुलै, २०२१/ आषाढ २३, १९४३ (शके)

७५. **सदस्यांना अटक, अटकाव, स्थानबध्दता, सुटका इत्यादीबाबत**

मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर यांचेकडून कळविण्यात आले आहे की, मुंबई फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (२), मनाई आदेश क्रमांक विशा/ मनाई आदेश/२३०६/२०२१, दिनांक ६/६/२०२१ अन्वये दिनांक ०७/०६/२०२१ रोजी ००:१ ते दिनांक ३०/०६/२०२१ वा.चे दरम्यान तसेच दिनांक १९/०६/२०२१ रोजीचा जावक क्रमांक विशा/ मनाई आदेश/२४३३/२०२१ अन्वये दिनांक २१/०६/२०२१ रोजी ००:१ ते दिनांक ३०/६/२०२१ रोजी २४:०० वा. पर्यंत जाहिर केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून नौपाडा पोलीस स्टेशन येथील दाखल गुन्हा रजि. नं. १८६/२०२१ अंतर्गत सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. निरंजन वसंत डावखरे यांना भारतीय दंड संहितेच्या कलम १८८, २६९, ३४, सह साथी रोग अधिनियम सन १८९७ चे कलम ३ व ४ अन्वये दिनांक २६/६/२०२१ रोजी १५.१७ वाजता ताब्यात घेऊन अटक केली व त्यांना वैयक्तीक जामीनावर मुक्त केले आहे.

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १५ जुलै, २०२१

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
७) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
९) संगणक कक्ष (website)